MHRG050011882015

खटला दाखल तारीख : १७/०३/२०१५
खटला नोंदणी तारीख : १७/०३/२०१५
खटला निकाल तारीख : २४/०२/२०२५
कालावधी : वर्षे, महिने, दिवस
०९ ११ ०७

## न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, तिसरे न्यायालय, पनवेल यांचे न्यायालय जि. रायगड

(पिठासीन अधिकारी एस.व्ही. साळवी)

**नियमीत फौजदारी खटला क्र. १७३/२०१५**
सी.एन.आर.क्र. MHRG050011882015
**निशाणी क्रमांक : १६**

**महाराष्ट्र शासनातर्फे पोलीस अधिकारी,**
**कळंबोली पोलीस स्टेशन, पनवेल, जि. रायगड** .....**अभियोग पक्ष**

**विरुद्ध**

१) **निखील संजय सोनवणे,**
वय–१९ वर्षे, धंदा–शिक्षण

२) **शशांक संजय सोनवणे,**
वय–२९ वर्षे, धंदा–केबल व्यवसाय

३) **संजय नारायण सोनवणे**
रा. करिष्मा सोसायटी, रूम नं अे/२०३ सेक्टर –१ ई कळंबोली कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड ......**आरोपी**

**गुन्हा :** भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, सह वाचनिय कलम ३४ प्रामणे

**वादकथनाकरिता उपस्थिती**

श्रीमती. आढाव : सहाय्यक सरकारी अभियोक्ता.
श्री. गोधंळी : आरोपी क्र. १ ते ३ चे वकील.

**: न्यायनिर्णय :**

(घोषित दिनांक २४/०२/२०२५)

प्रस्तुत खटला आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, सह वाचनिय कलम ३४ प्रमाणे शिक्षापत्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात येणेप्रमाणे.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी श्री. दुर्गेश अरूण शेलार यांनी दि. २३/१२/२०१४ रोजी दिलेल्या जबाबानुसार, सदरचा गुन्हा मा. कळंबोली सेक्टर–१ मधील नविन सुधागड शाळेच्या कोप–यावर कळंबोली गावाकडे जाणा–या रोडवर तसेच कळंबोली पोलीस ठाण्याचे गेट समोरील रोडवर दि. २२/१२/२०१४ रोजी २१.४५ वा. चे सुमारास घडलेला आहे.

यांतील फिर्यादी श्री. दुर्गेश अरूण शेलार हे रस्त्याने त्यांच्या घरी पायी चालत जात असताना आरोपी क्र. १ निखील संजय सोनवणे आरोपी क्र. २ शशांक संजय सोनवणे आरोपी क्र. ३ संजय नारायण सोनवणे हे समोरून त्यांची इरटिगा कार क्रमांक MH46/X–8990 यामधुन जात असतांना, त्यांच्या गाडीतुन त्यांच्यापैकी कोणीतरी यांतील फिर्यादी यांच्या अंगावर थुंकला म्हणुन यांतील फिर्यादी यांनी आरोपींची गाडी थांबवुन त्यांच्या अंगावर कोण थुंकला असा त्यांना जाब विचारला याचा यांतील आरोपी क्र. १ ते ३ यांनी मनात राग धरून, आपसात संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच तेथुनच आरोपी क्र. १ निखील संजय सोनवने याने दगड उचलुन फिर्यादी यांच्या डोक्यात व आरोपी क्र. २ शशांक संजय सोनवणे याने दगड उचलुन त्या दगडाने फिर्यादी याच्या कपाळावर मारून आपखुशीने दुखापती केल्या म्हणुन फिर्यादीने कळंबोली पोलीस ठाण्यात गु.र.नं.। १८५/२०१४ अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम ३२४, ५०४, सह वाचनिय कलम ३४ प्रमाणे फिर्याद दाखल केली.

३. प्रस्तुत प्रकरणात तपासी अधिका–यांनी गुन्ह्याचा तपास करुन साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपीस अटक करुन आवश्यक तो पुरावा प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केल. प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुद्ध निशाणी क्र. ७ वर दोषारोप निश्चित केले. आरोपीचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र. ८ ते १० वर नोंदविण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगून प्रकरणात संपरिक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षाच्या पुराव्यात आरोपींविरुद्ध गुन्हादर्शक परिस्थिती न असल्याने, आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

४. तज्ञ सरकारी वकील श्रीमती. आढाव व आरोपीचे तज्ञ वकील श्री. गोधंळी यांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रकरणात आलेला पुरावा पाहता न्यायालयाच्या अवलोकनार्थ खालील मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले आहेत. त्या मुद्दयांवर हे न्यायालय खालीलप्रमाणे निष्कर्ष कारणांसहीत आपला निर्णय देत आहे.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक २२/१२/२०१४ रोजी २१.४५ वाजण्याचे सुमारास कळंबोली सेक्टर–१ मधील नविन सुधागड शाळेच्या कोप–यावर कळंबोली गावाकडे जाणा–या रोडवर फिर्यादी हे त्यांच्या राहत्या घरी पायी चालत जात असताना आरोपी क्र. १ ते ३ हे त्यांची इर्टिगा गाडी क्र. MH46/X–8990 यामधुन समोरुन जात असताना आरोपींपैकी कोणीतरी फिर्यादी यांच्या अंगावर थुंकला म्हणून फिर्यादी यांनी गाडी थांबवुन अंगावर कोण थुंकला असे विचारले असता त्या गोष्टीचा मनात राग धरुन आरोपी यांनी संगनमताने फिर्यादीस शिवीगाळ व लाथाबुक्क्यानी मारहाण केली व आरोपी क्र. १ व २ यांनी दगड उचलुन फिर्यादी यांच्या कपाळावर मारुन आपखुशीने साध्या स्वरुपाची दुखापत केली व अशा प्रकारे | नकारार्थी |

आरोपी यांनी भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ सह ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला अपराध केल्याचे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ?

२. उपरोक्त् दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी संगनमताने फिर्यादी यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन शिवीगाळ केली व त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले, आणि अशा प्रक्षोभनामुळे आरोपीकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे आरोपींचा उद्देश होता किंवा तसे होण्याचा संभाव्य असण्याची आरोपींना जाणीव होती व अशाप्रकारे आरोपींनी भारतीय दंड संहिता चे कलम ५०४ सह ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला अपराध केल्याचे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? — नकारार्थी

३. काय आदेश ? — अंतीम आदेशाप्रमाणे

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता –**

६. आरोपींविरुद्ध दोषारोप सिद्ध करण्याचा सिद्धभार अभियोग पक्षावर होता. त्या सिद्धभारातून मुक्त होण्याकरिता अभियोगपक्षाने साक्षीदार फिर्यादी नामे श्री. दुर्गेश अरूण शेलार यांना नि.क्र. १३ वर तपासले.

७. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार श्री. दुर्गेश अरूण शेलार हा त्याच्या पुराव्यात सांगतो की, घटना डिसेंबर २०१४ मध्ये घडली होती. घटना अंदाजे रात्री ८.०० वाजता घडली होती. घटना कुठे घडली होती ते त्यांना आठवत नाही. त्यांना कोणी मारहाण केली ते त्यांना आठवत नाही. तसेच त्यांनी त्याचे जबाबातील मजकूर आठवत नसल्याचे त्याचे सरतपासात सांगितले आहे. सरकारी

वकीलांनी सदर साक्षीदारास फितूर घोषित करुन उत्तरसुचक प्रश्न विचारले त्यामध्ये पोलीस जबाबातील मजकूर आठवत नसल्याचे साक्षीदाराने सांगितले त्यांचेत व आरोपींमध्ये तडजोड झाल्याने त्यास केस पुढे चालवायची नसल्याचे तसेच इतर साक्षीदार तपासायचे नाही असे कथन केले.

८. सदर साक्षीदार हा सरकार पक्षास सहाय्य करीत नसल्याने, सरकार पक्षाने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु त्यातुन सरकार पक्षास सहाय्य होईल असे काही अभिलेखावर आले नाही. सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन दि. १४/०८/२०२४ रोजी सरकार पक्षाचा पुरावा बंद केलेला आहे. प्रस्तुत कामी पुरेशी संधी देवुनही सरकार पक्षाने इतर कोणतेही साक्षीदार तपासलेले नाहीत.

९. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन, फिर्यादी हे त्यांच्या राहत्या घरी पायी चालत जात असतांना आरोपी क्र. १ ते ३ हे इर्टिगा गाडी क्र. MH46/X-8990 यामधुन समोरून जात असताना आरोपींपैकी कोणीतरी फिर्यादी यांच्या अंगावर थुंकला म्हणुन फिर्यादी यांनी गाडी थांबवुन अंगावर कोण थुंकला असे विचारले असता त्या गोष्टीचा मनात राग धरून आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. १ व २ यांनी दगड उचलुन फिर्यादी यांच्या कपाळावर मारून आपखुशीने साध्या स्वरूपाची दुखापत केली, असा कोणताही आरोप संशयापलीकडे जावून सिध्द होत नाही. सबब मुद्दा क्र. १ ते २ चे उत्तर नकारार्थी देउन मुद्दा क्र. ३ च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१) आरोपी **निखील संजय सोनवणे, शशांक संजय सोनवणे व संजय नारायण सोनवणे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम ३२४,५०४, सह वाचनिय कलम ३४ खालील गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचे जामीन कदबे व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३) आरोपींनी कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेचे अनुपालनाकरीता विहित कालावधीकरीता प्रत्येकी रु.१५,०००/- चे वेगळे जामीनपत्र न्यायालयात सादर करावे.

४) प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमाल एक ओबड धोबड आकराचा लहान दगड व एक ओबड धोबड आकाराचा साधारण मोठा दगड मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Sd/-

पनवेल (एस. व्ही. साळवी)

दिनांक- २४/०२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पनवेल

(कोर्ट नं.३)